क्रमांक : १३६

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

**मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ / पौष ७, १९४३ (शके)**

संदर्भ :- १) या सचिवालयाचे पत्रक भाग -दोन क्र. ८१, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१

२) या सचिवालयाचे पत्रक भाग -दोन क्र.९८, दिनांक २ डिसेंबर, २०२१

१३६. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभा कामकाज सल्लागार समितीची सोमवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत सन २०२१ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनात खालीलप्रमाणे प्रश्नोत्तरे घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला :-

| अ.क्र. | गट | उत्तराचा दिनांक | सुधारित उत्तराचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | दोन | मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२१ | मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ |
| २. | तीन | बुधवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२१ | बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ |
| ३. | चार | गुरुवार, दिनांक ९ डिसेंबर, २०२१ | गुरुवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२१ |
| ४. | पाच | शुक्रवार, दिनांक १० डिसेंबर, २०२१ | शुक्रवार, दिनांक २४ डिसेंबर, २०२१ |
| ५. | एक | सोमवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२१ | सोमवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२१ |

त्यानुसार बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ ते मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ या कालावधीतील तारांकित स्वीकृत प्रश्न उक्त दिनांकाप्रमाणे प्रश्नोत्तराच्या यादीत समाविष्ट करण्यात आले.

तथापि, सोमवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी विधानसभा सभागृहात मंगळवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२१ ते शुक्रवार, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ रोजी कार्यवाहीत घेतलेले प्रश्न अतारांकित करण्याबाबत उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेल्या निदेशानुसार या अधिवेशनाकरीता

..२

तारांकित स्वीकृत करुन विभागाकडे पाठविण्यात आलेले प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत. तसेच मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२१ ते शुक्रवार, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ या कालावधीकरिता पाठविण्यात आलेले वस्तुस्थितीचे प्रश्न तपासून अतारांकित स्वीकृत करण्याच्यादृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : २८ डिसेंबर, २०२१

**याची प्रत :**

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
(३) संगणक कक्ष